लोकमत पू. पान क्र. १

डोंगरी येथील मेट्रो कारशेडच्या जागेत उभारणार

# खेळाच्या मैदानात पक्के हेलिपॅड बांधण्याचे काम अखेर रद्द

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईदरच्या उत्तन चौक येथील खेळाच्या मैदानात पक्के कायमस्वरूपी हेलिपॅड बांधण्याचे काम अखेर रद्द करण्यात आले आहे. आमदार प्रताप सरनाईक यांनी खेळाडू व ग्रामस्थांची मागणी पाहता मैदानात हेलिपॅड बांधण्याचे काम रद्द करण्याची विनंती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना केली होती. हे हेलिपॅड आता डोंगरी येथील मेट्रो कारशेडच्या सरकारी जागेत उभारले जाणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने खेळाच्या मैदानाबाबत असलेले न्यायालयाचे आदेश व नियमातील तरतूद धाब्यावर बसवून उत्तनच्या चौक डोंगरावरील खेळाच्या मैदानात पक्के हेलिपॅड बांधण्याचा घाट घातला होता.



आ. प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधल्यानंतर खेळाच्या मैदानातील पक्के हेलिपॅड बांधण्याचे काम रद्द करण्यात आले आहे.

- मैदानात स्थानिक मुले नियमित खेळतात, तसेच हे मैदान आरक्षणातील असल्याने हेलिपॅडला स्थानिक खेळाडू व ग्रामस्थांनी विरोध दर्शविला होता.
- वास्तविक उत्तनच्या केशवसृष्टी-रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे मंत्री, नेते येत असतात. तेथे हेलिपॅड असून त्यांच्याकडे प्रचंड प्रमाणात जमीन हेलिपॅड उभारण्यासाठी आहे.

## मुख्यमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांशी साधला संपर्क

१ शहरात अन्यत्र हेलिपॅडची गरज नसूनही एखादा मंत्री, नेता क्वचित हेलिकॉप्टरने येत असल्यास त्यावेळी तात्पुरत्या स्वरूपात हेलिपॅड केले जाते. आधी भाईंदरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात पक्के कायमस्वरूपी हेलिपॅड उभारण्याचा प्रयत्न सार्वजनिक बांधकाम विभागाने केला होता.

२ ठेकेदाराने मैदान खोदलेही होते; पण विरोध, कांदळवन क्षेत्र आदी कारणांनी तेथील हेलिपॅड बांधणे रद्द केले गेले. नंतर चौक मैदानात हेलिपॅड बांधणार असल्याचे कळताच आमदार प्रताप सरनाईक यांनी खेळाडू व ग्रामस्थांच्या मागणीवरून विरोध दर्शविला.

३ दी डोंगरी चौक फिशरमन संस्थेनेही आ. सरनाईक यांना निवेदन दिले होते. गुरुवारी आ. सरनाईक यांनी चौक मैदानास भेट देऊन ग्रामस्थ, खेळाडू यांच्याशी चर्चा केली. त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना भ्रमणध्वनीने संपर्क साधून मैदान हे खेळासाठी अत्यावश्यक असून, हेलिपॅड डोंगरी येथील मेट्रो कारशेडच्या सरकारी जागेत उभारण्याचा पर्याय दिला.

४ खेळाडू व ग्रामस्थांनी आ. सरनाईक यांचे आभार मानले. यावेळी जिल्हाप्रमुख राजू भोईर, विधानसभा क्षेत्रप्रमुख विक्रमप्रताप सिंह व सचिन मांजरेकर, महिला जिल्हा संघटक निशा नार्वेकर आदी उपस्थित होते.

## तरुणाची आत्महत्या



**नालासोपारा :** सातीवलीच्या डोंगरी परिसरात राहणाऱ्या विकास कुमार (२७) या तरुणाने आत्महत्या केली आहे. त्याने बुधवारी सकाळी कुत्रा बांधण्याच्या पट्ट्याने घराच्या छताच्या लोखंडी अँगलला गळफास घेत आत्महत्या केली आहे. वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. वालीव पोलिस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

## सदनिकेच्या नावे फसवणूक




**नालासोपारा :** शहराच्या पश्चिमेकडील श्रीप्रस्था परिसरात राहणाऱ्या तरुणी भावना ढोबळे (२८) यांची ७ ऑगस्ट २०२३ ते आजपर्यंत सदनिकेच्या नावावर लाखोंची फसवणूक झाली आहे. आरोपी मोनिष कोरे याने समेळ पाड्यातील इंपीरियल शेल्टर या इमारतीमध्ये सदनिका देतो असे सांगून रजिस्ट्रेशन केले, मात्र प्रत्यक्षात सदनिका न देता उडवाउडवीची उत्तरे देत भावना यांची ४२ लाख ५१ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करत अपहार केला आहे. नालासोपारा पोलिसांनी बुधवारी गुन्हा दाखल केला आहे. नालासोपारा पोलिस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

## पत्नीचे दागिने घेऊन पती पसार



**नालासोपारा :** जीवदानी रोडवरील अण्णापाडा येथे राहणाऱ्या सुनीता बेग (२४) यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र, कानातील झुमके आणि कपड्याच्या बॅगमध्ये ठेवलेली २ लाखांची रोख रक्कम हे सगळे आरोपी पती इकराम बेग याने १३ फेब्रुवारीला विश्वास संपादन करून नेले. विरार पोलिसांनी बुधवारी तक्रार आल्यावर गुन्हा दाखल केली आहे. विरार पोलिस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

CamScanner

लोकमत पू. पान क्र. 1

# नवरोबाने पत्नीला सोडून दुसरीशीच केला घरोबा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : पत्नीला सोडून जातो अशी सतत धमकी देत, दुसरीशी लग्न करून घरोबा करणाऱ्या नवरोबावर मीरा रोड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक प्रमोद पाटील हे पुढील तपास करत आहेत.




मीरा रोडच्या बेव्हर्ली पार्क भागात राहणाऱ्या सुदक्षिणा यांचे लग्न २००३ सालात अनिदितो मंडल (४६, रा. मध्यपाडा, जिल्हा नदिया, पश्चिम बंगाल) याच्याशी झाले होते. अनिदितो हा सुदक्षिणा यांनी केलेल्या स्वयंपाकाला नावे ठेवणे, घरात साफसफाई व्यवस्थित करत नाही म्हणून टोमणे मारणे, आजारी असताना पत्नीस डॉक्टरांकडे घेऊन न जाता दुर्लक्ष करणे, घरखर्चासाठी पैसे न देणे, बाहेरील लोकांसमोर त्यांना शिवीगाळ करून अपमान करणे, मारहाण करणे, आदी प्रकारे शारीरिक व मानसिक तसेच आर्थिक छळ करत होता.

## कायदेशीर घटस्फोट न घेता दुसरे लग्न

- अनिदितो याने पत्नी सुदक्षिणा हिला सोडून जाण्याची धमकी देऊन, तिला एकटीला सोडून गेला.
- तसेच त्याने कायदेशीर घटस्फोट न घेता त्याने परस्पर रिया बिश्वास नावाच्या महिलेसोबत बेकायदा लग्न केले, अशी फिर्याद सुदक्षिणानी दिली.
- त्या फिर्यादीवरून १९ मार्च रोजी मीरा रोड पोलिसांनी अनिदितोवर गुन्हा दाखल केला आहे.
- मीरा रोड पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास पोलिस करीत आहेत.

# फुगे फेकाल तर खबरदार!

## पोलिसांची फुगेबाजांवर करडी नजर

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : होळी सणामध्ये रंग खेळताना रंगाने भरलेले किंवा रासायनिक पदार्थाचा वापर करून भरलेले फुगे फेकून मारण्यास मनाई करण्यात आली आहे. वसईतील सर्वच पोलिस ठाणी अशा फुगेबाजांवर करडी नजर ठेवणार आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

धूलिवंदन व रंगपंचमी हे सण वसई तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येतात. या उत्सवात लहान मुले, तरुण-तरुणी, आबालवृद्ध मोठ्या उत्साहाने सहभागी होत असतात. धूलिवंदन व रंगपंचमी या दिवशी रंग खेळण्यासाठी रंगाने भरलेल्या रबरी फुग्यांचा वापर केला जातो. असे फुगे मारल्याने समोरच्या व्यक्तीस गंभीर स्वरूपाची शारीरिक इजा होऊ शकते किंवा कायमस्वरूपी अपंगत्व येऊ शकते. रंगपंचमीचा सण साजरा होत असताना अचानक फुगा फेकून मारल्याने सार्वजनिक रस्त्याने दुचाकी, चार चाकी व अन्य प्रवासी वाहनांच्या चालकाचे लक्ष विचलित होऊन गंभीर अपघात होण्याची शक्यता असते.



### फुगे बाळगणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई

- खबरदारीचे उपाय म्हणून हे फुगे बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. पोलिसांची अशा फुगेबाजांवर करडी नजर असणार आहे.
- खबरदारीचा उपाय म्हणून रंग तसेच रासायनिक पदार्थ भरून फुगे बाळगणे, रंगाने भरलेले फुगे किंवा अन्य चायनीज रंगाचे रासायनिक पदार्थ वापरून तयार करण्यात आलेले फुगे फेकून मारणे आता कायदेशीर कारवाईला पात्र असणार आहेत.
- अशा प्रकारचे फुगे जवळ बाळगणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# पाच वीजचोरांवर गुन्हा दाखल

नालासोपारा : हनुमाननगर येथील सागर प्लाझा अपार्टमेंटमध्ये राहणारे अयान सय्यद, नजमा शेख, अब्बास खान, जावेद खान, अन्वर शेख या पाच जणांनी वीजचोरी दंडाचे वीज देयक भरले नाही. ते न भरल्याने कंपनीची वीज चोरून ६२ हजार ८२० रुपयांचे नुकसान केले आहे. महावितरणचे अक्षय भांडारकर यांनी बुधवारी नालासोपारा पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे. नालासोपारा पोलिस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

# टाकीत उडी मारून आत्महत्या

नालासोपारा : फुलपाडा परिसरातील वसई विरार मनपाच्या जलतरण तलावच्या फिल्टर बॅलन्स पाण्याच्या टाकीचे झाकण काढून बुधवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास भीम बेहेरा (२८) या तरुणाने उडी मारली. त्याला पाण्याच्या टाकीतून बाहेर काढून उपचारासाठी मनवेल पाडा येथील हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी तपासून दाखल करण्याआधीच मृत घोषित केले. विरार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. याप्रकरणी विरार पोलिस अधिक तपास करीत आहेत.

CamScanner

लोकमत पू. पान क्र. 1

# गुजरात राज्यातूनही होऊ लागलीय खैरतस्करी

## खानिवडे टोल नाक्यावर लाकडाचा ट्रक जप्त



मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील खानिवडे टोल नाक्यावर खैर लाकडाने भरलेला ट्रक वन अधिकाऱ्यांनी पकडला.

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील खानिवडे टोल नाक्यावर खैर लाकडाने भरलेला ट्रक वन अधिकाऱ्यांनी पकडला असून, यावेळी अंधाराचा फायदा घेत ट्रकचालक फरार झाला आहे. त्यामुळे आता खैराची तस्करी गुजरात राज्यातून होत असल्याचे उघड झाले आहे.

गुजरात राज्यातून मुंबई-अहमदाबाद महामार्गाने खैर लाकडांची अवैध वाहतूक ट्रकद्वारे होणार असल्याची माहिती भाताणे वनपरिक्षेत्र अधिकारी विजय बारब्दे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना घेऊन गुरूवारी पहाटे खानिवडे टोल नाक्यावर सापळा रचला.

### अंधाराचा फायदा घेत ट्रकचालक फरार

- पहाटे पाच वाजता खैर लाकडांची अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रकला त्यांनी अडवले. त्यावेळी अंधाराचा फायदा घेत ट्रकचालक बाजूच्या रानात फरार झाला.
- जप्त केलेल्या ट्रकमधील खैर लाकडांची किंमत १५ लाख रुपये व जप्त केलेल्या ट्रकची किंमत ३५ लाख रुपये असा एकूण ५० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
- महामार्गवर आता ट्रकमधून अवैध लाकडांची तस्करी होत असल्याने चोरट्यांना कायद्याचा धाक राहिला की नाही, असा प्रश्न निर्माण होत आहे. मुंबई महामार्ग आता तस्करीचा केंद्रबिंदू बनत चालला आहे.

लोकमत पान क्र. 2

# मीरा-भाईंदरमध्ये महायुतीत तू तू मैं मैं

## ठाणे लोकसभा उमेदवारीवरून टीकेचे बाण

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** ठाणे लोकसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराचा प्रचार करणार नाही, अशी उघड भूमिका मीरा-भाईंदर भाजपमधील एका गटाने घेतली आहे. त्यावरून युतीच्या उमेदवाराचा विरोध म्हणजेच पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांची हॅट्ट्रिक करण्यास विरोध, अशी टीका शिवसेनेच्या शिंदे गटाने केली आहे. ठाणे लोकसभा कोणाकडे असावा, यावरून भाजप-शिंदे गटात मीरा-भाईंदरमध्ये तू तू मैं मैं सुरू आहे.

एक वादग्रस्त व्यक्ती व्यक्तिगत स्वार्थासाठी स्वतःलाच भाजप असल्याचे दाखवण्याचा केविलवाणा खटाटोप करत असल्याचा आरोपही शिंदे गटाने केला आहे. आ. प्रताप सरनाईक, माजी आ. रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के यांची शिवसेना शिंदे गटातून लोकसभेसाठी नावे चर्चेत आहे. मात्र मीरा-भाईंदरचे भाजपचे माजी आ. नरेंद्र मेहता यांनी आ. सरनाईक यांचे नाव न घेता त्यांच्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. ठाणे मतदारसंघ भाजपला मिळायला हवा व शिवसेना उमेदवाराचा प्रचार करणार नाही, अशी भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांची भूमिका असल्याचे मेहता यांनी म्हटले आहे.

दुसरीकडे मेहता यांचे समर्थक मानले जाणारे भाजप जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा यांनी मात्र पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी विराजमान व्हावेत ही भाजप कार्यकर्त्यांची इच्छा असून, कार्यकर्ते युतीचे काम करत आहेत, असे म्हटले आहे. पक्षश्रेष्ठी भाजप किंवा युतीचा जो उमेदवार देईल त्याला निवडून आणण्याचे काम कार्यकर्ते करतील, असेही त्यांनी सांगितले.

शिवसेना शिंदे गटाचे मीरा-भाईंदर विधानसभा क्षेत्रप्रमुख विक्रमप्रताप सिंह यांनी सांगितले की, नरेंद्र मेहतांना देशाच्या पंतप्रधानपदी पुन्हा नरेंद्र मोदी व्हावेत, अशी इच्छा नसावी, म्हणूनच ते युतीच्या उमेदवारास विरोध करत आहेत.

### कार्यकर्ते युतीचा धर्म पाळणार

- भाजप श्रेष्ठींच्या आदेशानुसार भाजप कार्यकर्ते काम करतील, असे भाजपचे मीरा-भाईंदर विधानसभा निवडणूक प्रमुख ॲड. रवी व्यास यांनी सांगितले.
- भाजप व युतीचे कार्यकर्ते पक्षादेशानुसार ठाणे लोकसभेच्या उमेदवारास निवडून आणण्यासाठी वचनबद्ध आहेत. त्यामुळे कोणी भाजप किंवा युतीमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करत असेल तर कार्यकर्ते त्यांना ओळखून आहेत, असे आमदार गीता जैन यांनी सांगितले.

लोकमत पू. पान क्र. 2

# नोकरीचे आमिष दाखवून बलात्कार

## फोटो काढून चार लाख उकळले : मीरा रोड पोलिसांत गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** नोकरी लावतो असे सांगून एका पुरुषाने महिलेवर बळजबरी केली आणि अर्धनग्न अवस्थेतील फोटो काढून ते पतीला दाखवायची धमकी देत ब्लॅकमेल केले आणि तिच्याकडून लाखो रुपये उकळल्याची घटना मीरा रोडमध्ये घडली. याप्रकरणी मीरा रोड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पीडित महिला ही विवाहित असून मुंबई पश्चिम उपनगरात राहते. शेखर सिंग नावाच्या इसमाने तिला नोकरीला लावतो सांगून गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये मीरारोडमधील एका लॉजमध्ये तिच्यावर बळजबरीने अत्याचार केले. तिच्या नकळत सिंग याने तिचे अर्धनग्न अवस्थेतील फोटो काढून पतीला दाखवीन असे सांगून धमकावले व ब्लॅकमेल केले. तिच्याकडून नोकरीला लावण्यासाठी म्हणून त्याने ३ लाख ८५ हजार रुपये उकळले. अखेर महिलेने बुधवारी, २० मार्च रोजी मीरारोड पोलिस ठाण्यात त्या व्यक्तीविरोधात फिर्याद दिल्यावर पोलिसांनी शेखर सिंगवर गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलिस निरीक्षक प्रवीण भोसले तपास करत आहेत.

CamScanner

पुण्यनगरी पृ. पान क्र.4

# करोडोंच्या कर्जाच्या आमिषाने व्यापाऱ्यांची कोट्यवधींची फसवणूक

## ▌चैनीसाठी गैरमार्गाने पैसै मिळवून हुशार तरुणाने बनवली आंतरराज्य टोळी

**।विजय देसाई**

**नालासोपारा :** करोडोंचे कर्ज देतो असे सांगून व्यापाऱ्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या, त्यांच्या नावाने घेतलेल्या आलिशान मोटारींचा वापर स्वतःच्या चैनीसाठी करणाऱ्या तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे. या तरुणाचे नाव सचिन ऊर्फ सौरभ उर्फ राहुल गिरीश शहा असे असून, त्याच्या अन्य साथीदारांनाही ताब्यात घेण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राहुल हा शालेय जीवनात अतिशय हुशार विद्यार्थी म्हणून ओळखला जात असे. वर्गात त्याचा नेहमी पहिला क्रमांक येत असे. एकदा त्याच्या वडिलांना कर्ज हवे होते, मात्र त्यांचा सिबिल स्कोअर खराब असल्याने अनेक खेपा घालूनही बँकेतून त्यांना कर्ज मिळत नव्हते. शेवटी एका एजंटच्या माध्यमातून त्यांनी कर्ज मिळवले. त्यामुळे राहुलला नवी दिशा मिळाली. तीच पद्धत वापरून त्याने एक-दोन नव्हे तर तब्बल १३ गुन्हे केल्याचे उघड झाले आहे. त्याला २०१२ साली सीबीआय ने अटकही केली होती. त्यानंतर तो जामिनावर सुटला होता.

नंतर स्वतःचे अस्तित्व लपवून पुरावे नष्ट करून बनावट आधार कार्ड व त्यावर स्वतःचे नाव बदलून कर्नाटक, प. बंगाल, दिल्ली व नेपाळ अशा वेगवेगळ्या राज्यातील आलिशान हॉटेलमध्ये वास्तव्य करीत त्याने गुन्हे करणे सुरूच ठेवले होते, असे पोलिसांनी सांगितले. त्याने यासाठी काही जणांना सोबत घेतले होते. त्यांची टोळी वेगवेगळ्या राज्यात कार्यरत होती. बँकेची बनावट एनओसी तयार करून दुसऱ्यांच्या नावाने कर्जाऊ घेतलेल्या महागड्या मोटारींची परराज्यात विक्री करणाऱ्या या आंतरराज्य टोळीला जेरबंद करण्यास आचोळे पोलिसांना यश आले आहे.

पोलिसांनी विविध राज्यातून करोडो रुपये किमतीच्या १२ कार जप्त केल्या आहेत. स्वतःचे अस्तित्व लपवून पुरावे नष्ट करून बनावट आधार कार्ड व त्यावर स्वतःचे नाव बदलून कर्नाटक, प. बंगाल, दिल्ली व नेपाळ येथील आलिशान हॉटेलमध्ये वास्तव्य करीता होता. हायप्रोफाईल पब, डान्सबार मध्ये लाखांचा खर्च करून तो स्वतःचे इम्प्रेशन तयार करत असे आणि त्याद्वारे नवनवी सावजे गाठत असे.



नालासोपाऱ्याचे व्यापारी जगदीश माळी यांना ऑक्टोबर २०२२ मध्ये आरोपी राहुल शहा भेटला. त्याने स्वतःची ओळख सी.ए अशी करून दिली. माळी यांच्या व्यवसायासाठी दोन कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करून देतो, असे सांगून त्याने त्यांच्याकडून विविध कागदपत्रांवर सह्या करून घेतल्या. त्या कागदपत्रांच्या मदतीने त्याने महागड्या कार खरेदी केल्या. त्याची पुन्हा बनावट कागदपत्रे बनवून त्याने एकूण २ कोटी ८४ लाख ४९ हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात २८ सप्टेंबर २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या फसवणुकीमागे आंतरराज्य टोळी असण्याची शक्यता आहे. त्यामुळे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, पोलीस निरीक्षक विवेक सोनवणे, (गुन्हे), पोलीस निरीक्षक विजय चव्हाण, तपास पथकाचे यशपाल सूर्यवंशी, सुहास म्हात्रे, दत्तात्रय दाईंगडे, शंकर शिंदे, निखिल चव्हाण, विनायक कचरे, अमोल सांगळे, मोहनदास बंडगर, मनोज पाईकराव, अमोल बरडे यांनी विविध पथके तयार करून मुख्य आरोपी राहुल गिरीश शहा याला अटक केली.

राहुल हा ज्यांचे सिबिल खराब आहे त्यांना हेरून त्यांना सिबिल वाढवूया, असे सांगून त्यांच्याकडून बँकेचे सगळे व्यवहार करण्याचे अधिकार मागून घेत असे. सगळे व्यवहार करण्यापूर्वी ग्राहकांना तो अलिशान डान्सबारमध्ये नेऊन त्यांचे लाखा-लाखांचे बिल देत असे. फसवणूक करून मिळवलेल्या आलिशान गाडीचा वापर करत असे. बँक मॅनेजरला इम्प्रेस करण्यासाठी ज्या ग्राहकाला घेऊन जायचा, मी यांचा सीए आहे आणि कोट्यवधी रुपयांचे कर्ज हवे आहे, असे सांगत ग्राहकाकडून १० लाखांचे करंट खाते उघडायला भाग पाडत असे. मॅनेजरचा विश्वास प्राप्त केल्यानंतर ग्राहकाच्या नावाने कर्ज मंजूर घेणे, एटीएम किंवा क्रेडिट कार्ड वापरून ग्राहकाच्याच नावाने पैसे काढून घेऊन परागंदा व्हायचा. बँकांचा तगादा मात्र ग्राहकाच्या मागे लागायचा. आजवर केलेल्या व्यवहारात त्याने हाच प्रकार केला. त्याने स्वतःच्या नावाने कुठेही व्यवहार केलेला नसल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. राहुल याला एका आलिशान हॉटेलमधून ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्याकडून आठ भारतीय सीमकार्ड, एक नेपाळचे सीम कार्ड, दोन लॅपटॉप, एक आयपॅड, नऊ मोबाईल व तीन बनावट आधार कार्ड असा एकूण ३ लाख ३४ हजारांचा मुद्देमाल मिळाला आहे. या गुन्ह्यात आरोपी राहुल ऊर्फ सचिन ऊर्फ सौरभ गिरीश शहा याच्यासोबत आरोपी विजय सुरजमनी सिंग, भिकाजी ऊर्फ उमेश बबन गोपाळे, मोहम्मद नजर मो. जाफर खान, प्रवीण ऊर्फ राणू हुकूमचंद जैन, आकाश धोंडीभाऊ मुसळे, विवेक रामदास करंडे अशा आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून २ कोटी ३४ लाख ५३ हजार ३०२ रुपये किमतीच्या एकूण १२ महागड्या कार जप्त केल्या आहेत.

CamScanner

पुण्यनगरी पृ. पान क्र. १

# हातभट्टी दारू विक्रीप्रकरणी दोघांना अटक

**मीरा रोड :** भाईंदर पोलीस ठाणे हद्दीतील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानासमोर गावठी हातभट्टी दारू विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना भाईंदर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. त्यांच्याकडून ४०० लिटर गावठी हातभट्टी दारू व वाहन जप्त केले आहे.

भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रकटीकरण पथक मंगळवारी रात्री पेट्रोलिंग करत असता, पोहवा के.पी. पवार यांना एका कार मधून गावठी हातभट्टी दारू विक्रीस घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार रात्रपाळीला ड्युटीवर असलेले सपोनि नरोटे व इतर पोलीस पथकाने नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान चौक येथे सापळा लावला. त्यावेळी त्यांना मध्यरात्री एक कार संशयास्पद येताना दिसली. त्या कारचालकाला थांबण्याचा इशारा केला. तेव्हा कारचालकाने त्यांची कार न थांबवता पोलिसांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न केला.

त्यावेळी पथकाने कार अडवून कार रस्त्याच्या कडेला घेण्यास सांगितली. तेव्हा चालकाने कार रस्त्याच्या कडेला थांबवली. चालकाला नाव विचारले असता, त्याने मच्छिंद्र लहू मढवी (४०, रा. मु. पोस्ट अंजुरगाव, भिवंडी) व त्याचे बाजूस बसलेले व्यक्तीचे नाव सुरज सुनील कोळी (२४, रा. अंजुरगाव, भिवंडी) असे सांगितले. त्यावेळी त्यांच्या गाडीची तपासणी केली असता पाठीमागील डिकीत प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये गावठी हातभट्टीची दारू भरलेली दिसली. या सर्व गोण्या उघडून पाहिल्या. तेव्हा १० गोण्या मिळून ४०० लिटर गावठी हातभट्टी दारू आढळली. ही दारू व वाहन असा एकूण २,१५,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या दोघांवर भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सकाळ पृ. पान क्र. ३

# बविआ अद्याप तळ्यात-मळ्यात

विरार, ता. २१ (बातमीदार) : लोकसभा निवडणुकीचे वारे सुरू झाले आहेत. कुठल्याही राजकीय पक्षाकडून उमेदवार घोषित झालेले नसले तरी बहुजन विकास आघाडीने आपण पालघर निवडणूक लढवणार असल्याचे संकेत दिले आहेत. या पक्षाचे सर्वेसर्वा आमदार हितेंद्र ठाकूर यांनी अजून यावर कोणतेही भाष्य केले नाही. मात्र, बविआ निवडणूक लढवणार की, कोणाला पाठिंबा देणार, हे अजूनही गुलदस्त्यात राहिले आहे. असे असले तरी बविआच्या कार्यकर्त्यांच्या बैठका मात्र जोरात सुरू आहेत. निवडणुकीचा अंतिम निर्णय हा हितेंद्र ठाकूर यांच्यावर सोपवण्यात आला आहे.

पालघर लोकसभेत सध्या शिवसेनेचा खासदार असला, तरी गेल्या पाच वर्षांत पुलाखालून बरेच पाणी गेले आहे. जिल्ह्यात भाजपला पुन्हा एकदा पाय रोवायचे असल्याने; तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ४०० पारचा नारा दिल्याने पालघर मतदारसंघाकडेही लक्ष लागून राहिले आहे. त्यामुळे महायुतीच्या जागा वाटपात अजूनही हा मतदार संघ एकनाथ शिंदे शिवसेनेकडे की भाजपकडे याचे जागा वाटप रखडल्याचे बोलले जात आहे. दुसऱ्या बाजूला सर्वांत जास्त आमदार असलेल्या बविआच्या निर्णयाकडे महायुती आणि आघाडीचे लक्ष लागून राहिले आहे. बविआ पक्ष पातळीवर कार्यकर्त्यांकडून उमेदवार रिंगणात असावा, असा सूर नेतृत्वाकडे लावला जात आहे. कार्यकर्त्यांच्या सभा होत आहेत आणि त्यातून कार्यकर्त्यांची मते जाणून घेण्यात येत आहेत. त्यातच बविआने निवडणूक लढवण्याचे संकेत दिल्याने निवडणुकीला रंग चढणार आहे. मात्र, निवडणुकीसंदर्भात अंतिम निर्णय हा आमदार हितेंद्र ठाकूर घेणार असल्याने ते काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.



**विरार :** आमदार हितेंद्र ठाकूर यांनी कार्यकर्त्यांची सभा घेत चर्चा केली.

## बविआचा कार्यकर्ता मेळावा

**बोळींज (बातमीदार) :** वसई, विरार, पालघरमध्ये बविआकडून कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात निवडणुकीच्या तयारीला लागण्याबाबत चर्चा करण्यात आली. या वेळी ५०० हून अधिक पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह संघटक सचिव आजीव पाटील, माजी नगरसेवक पंकज ठाकूर, विलास चोरघे, प्रशांत राऊत उपस्थित होते. काही दिवसांपासून बविआ आपला कोणता उमेदवार उभा करणार? तसेच कोणासोबत युती करणार? अशा चर्चांना उधाण आले आहे. या मेळाव्यात कार्यकर्त्यांना उमेदवाराबद्दल विचारणा केली असता, आपला हक्काचा उमेदवार हवा असे त्यांनी म्हटले. यावर वरिष्ठांशी चर्चा करून लवकरच याबाबत कळवण्यात येईल, अशी माहिती दिली. बविआमध्ये उमेदवारीसाठी तरुण श्रेष्ठ असे अनेक उभरते चेहरे तयार असल्याची माहितीही या वेळी देण्यात आली.

CamScanner

पुढारी पान क्र. ४

# मिरा-भाईंदर पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन सुरू

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १६ मार्च पासून देशभरात आचारसंहिता लागू करण्यात आली असून त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाअंतर्गत काशिमीरा, काशिगांव, मिरारोड, नयानगर, नवघर, भाईंदर, उत्तन पोलीस ठाण्यात ऑल आउट, कोबिंग ऑपरेशन व नाकाबंदी राबवण्यात आली होती. पोलीस आयुक्तालय व परिमंडळ-१ अधिनस्त विभागीय सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व अंमलदार यांनी या कोंबिंगमध्ये सहभाग घेतला होता. या ऑलआउट कोबिंग ऑपरेशन दरम्यान २ आरोपी यांना अटक करण्यात आली. एन.डी.पी.एस. कायदयान्वये ११ केसेस करण्यात आल्या .१७ जणांवर सी.आर.पी.सी. १०७ प्रमाणे प्रतिबंधत्मक कारवाई करण्यात आली. दारुबंदी कायद्यान्वये ६ गुन्हे दाखल करण्यात आले. कोप्ता अंतर्गत १५ एन.सी. दाखल करण्यात आल्या.

१७ हिस्ट्रीशिटर तपासण्यात आले. ८ विदेशी नागरीकांची तपासणी केली. तसेच ७ तडीपारांसाह ५४ हॉटेल व लॉजेस तपासले. यामध्ये १९ ठिकाणी नाकाबंदीच लावण्यात आली होती .या नाकाबंदीत



३९७ संशयीत वाहने तपासण्यात आली असून मोटार वाहन कायदया अन्वये १४९ केसेस करण्यात आल्या असल्याची माहिती मीरा- भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कडून देण्यात आली आहे.

पुढारी पान क्र. ३

# बेकायदा लॉटरीप्रकरणी आठ जणांवर गुन्हा

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदरमध्ये बेकायदेशीररित्या ऑनलाईन लॉटरी चालवल्या प्रकरणी आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पश्चिमेच्या एच. एम. टॉकीज येथील गल्लीतील एका दुकानामध्ये बेकायदेशीररित्या लॉटरी चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार मध्यवर्ती गुन्हे शाखेने त्या ठिकाणी छापा टाकला. दरम्यान बेकायदेशीररित्या लॉटरी (जुगार) चालवला व खेळला जात असल्या प्रकरणी मध्यवर्ती गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे. लॉटरी चालवणाऱ्या व खेळणाऱ्या अश्या आठ जणांवर भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्या ठिकाणी लॉटरी चालविण्यास परवानगी नसतानाही संगणकावर दोन जण लॉटरी चालवत असल्याचे दिसून आले. तसेच या ठिकाणी आणखी सहा जण लॉटरी खेळताना आढळून आले. त्यामुळे लॉटरी व्यवसाय मालक सुधीर महाडिक (४२) व लॉटरी चालक अनिल सविता (३४) आणि त्यांचे कर्मचारी व खेळण्यासाठी आलेले नागरिक अशा आठ जणांवर जुगार प्रतिबंधित अधिनियमाखाली मध्यवर्ती गुन्हे शाखेकडून भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढारी पू. पान क्र. १

# २५४ दुचाकींवर दंडाची कारवाई

**पालघर :** वसई-विरार, मीरा-भाईंदर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात विना हेल्मेट प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारांवर वाहतूक विभागाने कारवाईचा बडगा उगारला असून आतापर्यंत २६४ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे. वसई -विरार शहरात दुचाकीस्वारांच्या मृत्यूचे प्रमाण खूप आहे. रस्ते अपघातात हे मृत्यू होत असून नियमांचे पालन न केल्याने अपघाती मृत्यू होत असल्याचे समोर आले आहे.

CamScanner

लोकसत्ता पान क्र. ३

# भाईंदरमध्ये भाजपच्या दोन गटांत हाणामारी

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राजकीय वातावरण तापू लागले आहे. मीरा-भाईंदर शहरामध्ये गुरुवारी भाजपच्या दोन गटांत एका बैठकीदरम्यान जोरदार हाणामारी झाली. येथे तणाव आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मीरा-भाईंदरमधील भाजप पक्षाच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक प्रदेश कार्यकारिणीने बोलावली होती. मीरा रोडच्या गोल्डन नेस्ट येथील ब्लू मून क्लब येथे ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत माजी आमदार नरेंद्र मेहता व रवी व्यास यांच्या गटातील कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी कार्यक्रमात रवी व्यास यांना सन्मान न देता डावलल्याने त्यांचे समर्थक संतप्त झाले होते. काही वेळाने हे संतप्त कार्यकर्ते थेट मंचावर चढले. हे पाहून नरेंद्र मेहता समर्थकदेखील आक्रमक झाले. सुरुवातीला शाब्दिक चकमक झाली. मात्र त्यानंतर वाद वाढून त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला.

## दोघे निवडणुकीसाठी इच्छुक

**मीरा भाईंदर भाजप पक्षात मागील तीन वर्षांपासून माजी आमदार नरेंद्र मेहता आणि भाजप नेते रवी व्यास यांचे दोन गट आहेत. मेहता आणि व्यास हे दोघे देखील आगामी विधानसभा निवडणूक भाजप पक्षातून लढण्यास इच्छुक आहेत. त्यामुळे वाद वाढला आहे.**

लोकसत्ता पू. पान क्र. १

# ५०हून अधिक इमारती पाण्याखाली जाण्याचा धोका

## सेंट्रल पार्क येथे रस्त्याची उंची वाढविण्याचे काम सुरू

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**वसई :** नालासोपारा पूर्वेला सेंट्रल पार्क येथे पालिकेने रस्त्याची उंची वाढविण्याचे काम हाती घेतले आहे. मात्र रस्ता उंच झाल्याने परिसरातील ५० हून अधिक रहिवाशी संकुलांमध्ये पावसाळ्यात पाणी साचण्याचा धोका निर्माण झाला आहे.

नालासोपारा पूर्वेला सेंट्रल पार्क नावाचा परिसर आहे. मुळात हा भाग सखल आहे. तुळींज पोलीस ठाण्यापासून ओस्वाल नगरीपर्यंतचा भाग पावसात पाण्याखाली जातो. यामुळे वाहतूक ठप्प होत असते. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पालिकेने तुळींज येथील सेंट्रल पार्क परिसरातील रस्त्याची उंची वाढविण्याचे काम हाती घेतले आहे. सुमारे बाराशे मीटर रस्त्याची उंची वाढविण्यासाठी ५ कोटी ८० लाख रुपयांचा ठेका देण्यात आला आहे.

> रस्ता उंच झाल्याने येत्या पावसात पाणी साचणार नाही आणि वाहतूक व्यवस्था कोलमडणार नाही. नालेसफाई केली जाणार असून पाणी जाण्याचे मार्ग तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे इमारतींमध्ये पाणी साचण्याचे प्रमाण कमी होईल.
>
> – **प्रदीप पाचंगे**, कार्यकारी अभियंता

सध्या हे काम सुरू आहे. मात्र रस्त्याची उंची वाढल्याने परिसरात असलेल्या ५० हून अधिक इमारतींमध्ये पाणी साचण्याचा धोका निर्माण झाला आहे.

पावसात आमच्या इमारतीच्या भोवती पाणी साचत होते. मात्र आता रस्ता उंच झाला तर पाणी जाण्याचा मार्गच उरणार नाही आणि आमच्या इमारती पाण्याखाली जातील, अशी भीती स्थानिक नागरिक राधेश्याम मिश्रा यांनी व्यक्त केली. रस्ता उंच केल्याने रस्त्यावरील पाणी साचण्याची समस्या दूर होईल; पण आमच्या इमारतींमध्ये पाणी साचण्याची नवीन समस्या निर्माण होईल, असे गीता यादव या महिलेने सांगितले. तसेच या परिसरात तयार होत असलेल्या एका मॉलसाठी हा रस्ता उंच केला जात असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

CamScanner

लोकसत्ता पू. पान क्र. १

# मृत मतदारांची नावे पुन्हा यादीत

## बोगस मतदानाची शक्यता; पालघर लोकसभा मतदारसंघात २१ लाख मतदार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** पालघर लोकसभा मतदारसघांत २१ लाख मतदारांची नोंद झाली असली तरी मयत मतदारांचे नाव यादीतून वगळले नसल्याचे आढळून आले आहे. अद्याप यादीत मयत मतदारांची नावे हजारोंच्या संख्येत असल्याने येत्या निवडणुकीत बोगस मतदान होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

पालघर लोकसभा मतदारसंघासाठी २१ लाख ५८९ मतदारांची नोंद झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने नुकतीच प्रसिद्ध केली आहे. यात सर्वाधिक म्हणजे ५ लाख ४० हजार मतदार हे नालासोपारा विधानसभा मतदारसंघात आहेत. या यादीमध्ये अनेक मयत मतदारांची नावे असल्याच्या तक्रारी करण्यात येत आहेत. जे मतदार मरण पावले आहेत त्यांची नावे अद्याप वगळण्यात आलेली नाहीत.

ज्या वेळी एखादी व्यक्ती मरण पावते तेव्हा त्याचे कुटुंबीय संबंधित महापालिका, नगर परिषद किंवा ग्रामपंचायतीमधून मृत्यूचा दाखला काढत असतात. मात्र मयत झालेल्या व्यक्तीचे नाव वगळण्यासाठी ऑनलाइन अर्ज करावा लागतो. परंतु मतदार याद्यांमध्ये नावे समाविष्ट करणे, वगळणे आदीबाबत असलेली उदासीनता पाहता स्वतःहून नावे वगळण्याचे प्रमाण नगण्य आहे. त्यामुळे या याद्यांमध्ये मयत झालेल्या व्यक्तींची नावे मोठ्या संख्येने आहेत, असे शिवसेना वसई विरारचे उपजिल्हाप्रमुख नवीन दुबे यांनी केला आहे. नागरिक नावे वगळण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. त्यामुळे महापालिका, नगर परिषदेकडून मृत्यूचे दाखले घेऊन नावे वगळण्यात यायला हवीत, अशी मागणी दुबे यांनी केली. या मयत मतदारांच्या नावांमुळे येत्या निवडणुकीत बोगस मतदान होण्याची शक्यताही त्यांनी वर्तवली आहे.

मतदार याद्या अद्ययावत करण्याची मोहीम वेळोवेळी घेतली जाते. त्यामुळे घराघरात जाऊन सर्वेक्षण करून मयत व्यक्तींची नावे वगळण्यात येतात अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

### ५० हजार नावे?

**खासदार राजेंद्र गावित यांनीदेखील मयत मतदारांची नावे मोठ्या संख्येने मतदार यादीत असल्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. मयत झालेल्या मतदारांची सुमारे ५० हजारांपेक्षा जास्त नावे या यादीमध्ये असण्याची शक्यता गावित यांनी वर्तवली आहे.**



# वसईच्या औद्योगिक वसाहतीमधील भीषण आगीत कंपनी जळून खाक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**वसई :** वसई पूर्वेच्या नवघर औद्योगिक वसाहतीमधील एका प्लास्टीक कंपनीला गुरुवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास भीषण आग लागली. सुमारे दीड तासांच्या शर्थीच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. आगीच जीवितहानी झाली नसली तरी कंपनी जळून खाक झाल्याने मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.

नवघर पूर्व औद्योगिक वसाहतीत गीता इंडस्ट्रियल इस्टेटमधील छापरिया इंडस्ट्रीज या कोरोगेटिव्ह बॉक्स बनवणारी कंपनी आहे. गुरूवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास आग लागली. त्यानंतर ही आग बाजूला असलेल्या शैलेश इंडस्ट्रियल इस्टेट मधील गॉलॅपसिबल ट्यूब कॉर्पोरेशन या खेळणी व ॲल्युमिनियम कोलॅप्सिबल ट्यूब्स, मल्टीलेयर लॅमिनेटेड ट्यूब्स बनवणाऱ्या कंपनीत पसरली. अवघ्या काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले. आगीची माहिती मिळताच नजीकच्या नवघर अग्निशमन उपकेंद्राच्या अग्निशमन जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर आचोळे मुख्य अग्निशमन केंद्र व सनसिटी येथील उपकेंद्रातून पाच पाण्याचे टँकर आणि पाच अग्निशमन वाहने घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू झाले. दुपारी पावणेबाराच्या सुमारास आम्हाला आगीची माहिती मिळाली. कंपनीत शिरायला जागा नव्हती. त्यामुळे आग नियंत्रणात अडचणी आली होती. मात्र सव्वा तासात आगीवर नियंत्रण मिळवले, असे सनसिटी अग्निशमन केंद्रप्रमुख विशाल शिर्के यांनी सांगितले.

CamScanner

लोकसत्ता पु. पान क्र. १

# सनसिटी रस्त्यावर अवजड वाहनांना बंदी

लोकसत्ता प्रतिनिधी


**वसई:** वसई-विरार महापालिकेने सनसिटी येथील रस्त्याची उंची वाढविण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे या रस्त्यावरून अवजड वाहनांच्या वाहतुकीला बंदी घालण्यात आली आहे.

पावसाळ्यात वसई पश्चिमेतील सनसिटी- गास रस्ता हा पाण्याखाली जातो. यामुळे येथील वाहतूक पूर्णपणे ठप्प होऊन या भागात राहणाऱ्या नागरिकांना ये जा करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. गास, भुईगाव, निर्मळ यासह आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना जुन्या वसई पश्चिमेकडील बंगली रस्त्याने वळसा घालून प्रवास करावा लागतो.

यातून सुटका व्हावी यासाठी पालिकेने सनसिटी ते गास टोकपाडा, तुळजाभवानी उद्यान ते सनसिटी चौकी इथपर्यंतचा रस्त्याची उंची वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या दोन्ही रस्त्यासाठी सुमारे १०.५३ कोटी इतका निधी खर्च केला जाणार आहे.

त्या रस्त्याचे काम आता महापालिकेने सुरू केले आहे. साडेतीन फूट इतकी रस्त्याची उंची वाढविली जाणार आहे.

काम सुरू असल्याने खारभूमीच्या जागेतून पर्यायी रस्त्याची सुविधा करण्यात आली आहे. या कामामुळे सनसिटी येथील रस्त्यावर अवजड वाहनांच्या वाहतुकीला बंदी घालण्यात आली आहे. तसे सूचना फलक सनसिटी रस्त्याच्या प्रवेश मार्गावर लावण्यात आले आहेत.




## धुळीच्या त्रासाने कोंडी

पर्यायी रस्त्याची व्यवस्था करण्यात आली असली तरी येथून मोठ्या संख्येने वाहने ये जा करतात त्यामुळे प्रचंड प्रमाणात धूळ उडू लागली आहे. या धुळीच्या त्रासामुळे नागरिकांची कोंडी होऊ लागली आहे. या रस्त्याचे काम सुरू असेपर्यंत नागरिकांना याच पर्यायी मार्गाने प्रवास करावा लागणार आहे.

## पर्यायी रस्त्यावर वाहने अडकून पडण्याची शक्यता

सनसिटी रस्त्यावर काम सुरू असलेल्या पर्यायी रस्ता उपलब्ध केला आहे परंतु ती जागा खारभूमी आहे. यावरून जर अवजड वाहनांची वाहतूक झाली तर ती अडकून पडू शकतात. वाहतुकीला त्याचा अडथळा निर्माण होईल म्हणून या रस्त्यावर बंदी घालण्यात आल्याची माहिती वाहतूक पोलिसांनी दिली आहे.

CamScanner

दैनिक यशोभूमि

# 5 वर्ष से फरार तीसरा आरोपी गिरफ्तार

मीरा रोड । प्रतिनिधि

गत दिनों पुलिस आयुक्त मधुकर पांडे की पहल पर मीरा-भाईंदर शहर में नवसृजित काशीगांव थाने के शुरू होने के बाद से थाने के अभिलेखों में वांछित आरोपियों की तलाश पुलिस द्वारा सरगर्मी से शुरू कर दी गई और इसी कड़ी में पुलिस को मिले दस्तावेजों के अनुसार 13 मार्च 2019 को शिकायतकर्ता रिटा पटेल के पति योगेश पटेल को मुबारक अली कमजुमा खान, अंकुश अनिलभाई अग्रवाल, लल्लू नामक तीन लोगों ने फाउंटन होटल में बुलाकर मारपीट कर 60,000 रुपये के साथ आधार कार्ड और पैन कार्ड भी जबरन ले लिया। शिकायतकर्ता की शिकायत पर काशीमीरा थाने में मामला दर्ज किया था।



उक्त मामला दर्ज होने के बाद प्रारंभिक जांच में पुलिस ने 21 जून 2019 को आरोपी मुबारक अली खान को बोरीवली एवं 31 जुलाई 2019 के दिन नंदुरबार से अंकुश अग्रवाल को गिरफ्तार किया, पर तीसरा आरोपी लल्लू फरार था। पुलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड़ एवं वरिष्ठ पुलिस निरीक्षक राहुल पाटिल व उनकी टीम द्वारा चलाये जा रहे ऑल आउट ऑपरेशन के दौरान सत्यनारायण राम कैलास पाल उर्फ लल्लू को बेहद नाटकीय अंदाज में पिछले 5 वर्षों से फरार चल रहे आरोपी को पुलिस ने गिरफ्तार कर सलाखों के पीछे डाल दिया।



CamScanner

ठाणे (महाराष्ट्र), वर्ष 3, अंक 210, शुक्रवार, दिनांक : 22 मार्च 2024 पृष्ठ - 4, मूल्य : 4/- RNI No. MAHHIN/2021/83572, GSTIN-27AAAJH0523M1ZB, ठाणे, मुंबई, पालघर, नवी मुम्बई, रायगढ़, रत्नागिरी तथा सिंधदुर्ग में वितरण

दैनिक

# हिन्द सागर

Web : www.hindsagar.com

HIND SAGAR




धोनी काफी पहले समझ गए थे कि क्रिकेट अहम है लेकिन उनके लिए सब कुछ नहीं : जहीर

P-2

रूस-यूक्रेन संघर्ष हल करने को बातचीत, कूटनीति आगे का रास्ता



P-4

# काशीगांव पुलिस ने 5 वर्ष से फरार आरोपी को किया गिरफ्तार

**हिन्द सागर @ विनय दूबे**

मीरा-भाईंदर, काशीगांवः गत 14 मार्च को mbvv पुलिस आयुक्त मधुकर पांडे की पहल पर मीरा भायंदर शहर में नवसृजित काशीगांव थाने के शुरू होने के बाद से थाने के अभिलेखों में वांछित आरोपियों की तलाश पुलिस द्वारा सरगर्मी से शुरू कर दी गई और इसी कड़ी में पुलिस को मिले दस्तावेजों के अनुसार 13 मार्च 2019 को शिकायतकर्ता रिटा पटेल के पति योगेश पटेल को मुबारक अली कमजुमा खान, 2. अंकुश अनिलभाई अग्रवाल, 3. लल्लू इन तीनों ने फाउटन होटल में बुलाकर मारपीट कर 60,000/- रुपये के साथ आधार कार्ड और पैन कार्ड भी जबरन ले लिया, उपरांत शिकायतकर्ता की शिकायत पर काशीमीरा थाने में आईपीसी की धारा 364 ए, 365, 394, 325, 326, 323, 34 के तहत मामला दर्ज किया था।उक्त मामला दर्ज होने के बाद अपराध की प्रारंभिक जांच में पुलिस ने दिनांक 21/06/2019 को आरोपी मुबारक अली खान को बोरीवली एवं 31/7/2019 के दिन नंदुरबार से अंकुश अग्रवाल को गिरफ्तार किया ,पर तीसरा आरोपी लल्लू फरार था। पुलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड एवं वरिष्ठ पुलिस निरीक्षक राहुल पाटिल व उनकी टीम द्वारा चलाये जा रहे ऑल आउट ऑपरेशन के दौरान ही गुप्त सूत्रों के माध्यम से विश्वसनीय सूचना प्राप्त हुई कि उक्त अपराध में फरार लल्लू नाम का आरोपी काशीमिरा के नीलकमल नाका मार्केट में आया हुआ है, तुरंत जब क्राइम डिटेक्शन टीम ने खबर की पुष्टि के लिए उक्त परिसर की तलाशी ली तो उन्हें एक संदिग्ध व्यक्ति मार्केट में घूमता हुआ मिला, पुलिस टीम ने उसका पीछा किया और जब उससे पूछताछ करनी चाही तो वह भागने लगा, तो पुलिस दल ने उसका पीछा कर पकड़ लिया और हिरासत में लेकर कड़ाई से पूछताछ के दौरान उसने अपना नाम सत्यनारायण राम कैलास पाल उर्फ लल्लू बताकर अपने जुर्म को कबूल कर लिया और इस तरह बेहद नाटकीय अंदाज में पिछले 5 वर्षों से फरार चल रहे आरोपी को पुलिस ने गिरफ्तार कर सलाखों के पीछे डाल दिया।




CamScanner